**जिल्हा परिषद, नाशिक इवद विभाग क्रमांक-3 (प्रथम प्रसारण)**
**जाहीर ई - निविदा सुचना क्रमांक 01**
**सन 2026-2027**

नाशिक जिल्हा परिषद, मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक खालील कामांच्या निविदा **ई- टेंडरींग पध्दतीने नोंदणीकृत कंत्राटदार, मजुर सहकारी संस्था,सुबेअ यांचे करीता मागवित आहे.**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | प्र.मा.रक्कम | निविदा रक्कम (पार्ट "ए") | निविदा फॉर्म फी रक्कम + जीएसटी १८% | बयाणा रक्कम | राखीव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **क्र. जिपना/बांखा/इवद-3/प्रशा/129-130/26 दि. 12/03/2026** | | | | | | |
| १ | ३०५४-२१०५ | महालखेडा पाटोदा ते सांगवीकडे जाणारा रस्त्याची सुधारणा करणे ग्रामा 305 ता. येवला | 2500000/- | 2048599/- | 1180/- | 25000/- | मससं |

सदर निविदा मा. शासनाच्या या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येईल या निविदे संबधीची सर्व माहीती व अटी / शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. ही निविदा फक्त इंटरेटवरुनच खरेदी करता येईल. व इंटरनेटवरुनच भरता / दाखल करता येईल शिवाय निविदा फी व इसारा रक्कम ही सुध्दा Internet Banking व्दारे भरायचे आहे सर्व मक्तेदार / पुरवठादार यांनी Digital Signature रजिस्ट्रेशन / रिनीवल करणे आवश्यक आहे. निविदेचा तपशील जिल्हा परिषदेची वेबसाईट www.zpnashikgov.in वर सुध्दा उपलब्ध आहे.

**अटी / शर्ती**

1)निविदा फी आणि निविदा रकमेच्या 1% बयाणारक्कम ही निविदाकाराने Internet banking व्दारे www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर Online भरणे आवश्यक आहे.

२) कामांच्या बाबी दरामध्ये GST चा समसवेश केलेला नाही. निविदा परिशिष्ट "ब" मध्ये GST चा समावेश करण्यात आलेला आहे. कंत्राटदाराने निविदा सादर करतांना परिशिष्ट "अ" च्या अंदाजित किमतीच्या देकार सादर करावयाचा आहे. कामाचे देयक अदा करतांना कंत्राटदारास स्विकृत देकाराच्या किमतीवर नियमाप्रमाणे GST ची रक्कम मिळून देयक अदा करण्यात येईल. **कंत्राटदाराने निविदा सादर करताना व्यापारी लिफाफ्यातील देकार दि.01/07/2017 पासुन लागु करण्यात आलेल्या G.S.T दराबाबत विचार करुन निविदाकाराने त्याचा देकार सादर करावा.**

**3) GST, ROYALTY, LAB TESTING CHARGES, LABOUR INSURANCE, SQM वगळता निविदा दरामध्ये सर्व TAXES चा समावेश करण्यात आलेला आहे.**

४) सर्व अटी व शर्ती http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

5) बयाणा सुट प्रमाणपत्र स्वीकारण्यात येणार नाही.. RTGS / NEFT व्दारे निविदेची व बयाणा रक्कम भरणे ही पध्दत बंद करण्यात आलेली आहे याची निविदाकारांनी नोंद घ्यावी. बयाणा रक्कम Internet Banking व्यतीरीक्त कोणत्याही फॉर्म मध्ये जमा केल्यास निविदा नाकारण्यात येईल. निविदाकाराने त्यांच्या स्वत:च्या फर्मच्या नावे असलेल्या बँकेच्या खाते क्रमांकावरुनच पैसे वर्ग करणे बंधनकारक आहे. त्यासाठी निविदाकाराने निविदेतील परिशिष्ठ 1 मध्ये माहिती भरुन निविदेसोबत Upload न केल्यास निविदा नाकारण्यात येईल याची नोंद घ्यावी

6) ग्राम विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय दि.23/09/2012 मधील परिच्छेद क्र.3 (2) अन्वये 3 पेक्षा कमी निविदा धारकांनी निविदेत भाग घेतल्याचे निदर्शनास आल्यास उक्त शासन निर्णयाप्रमाणे आवश्यकतेप्रमाणे निविदेस मुदतवाढ देण्यांत येईल अथवा निविदा पुर्नप्रसारण करणेत येईल.

7) दोन किंवा दोनपेक्षा अधिक समान न्युनतम देकार आढळल्यास System Generated BoQ Comparative Chart (संगणकीकृत) प्रमाणे न्युनतम देकाराची निविदा न्युनतम प्रमाण मानुन स्विकारण्यात येईल.

8) निविदा सादरीकरण हे दोन लिफाफा पध्दतीने (Technical & Financial Bid) सादर करणे आवश्यक आहे.

9) निविदा सादरीकरण / स्विकृती फक्त ऑनलाईन पध्दतीनेच करणेत येतील.

10) कुठलेही कारण न दर्शविता एक किंवा सर्व ऑनलाईन निविदा नाकारणेचा अधिकार जिल्हा परिषद, नाशिक राखुन ठेवत आहे.

11) निविदा काराने ऑनलाईन पोर्टलवर अपलोड केलेल्या निविदेच्या कागदपत्रांचे अवलोकन केलेले आहे व त्या मधील सर्व अटी व शर्ती निविदा कारास मान्य आहे असे समजुन त्याने निविदा सादर केलेली आहे असे समजण्यात येईल.

12) निविदा काराने रु.500/- च्या स्टॅम्प पेपरवर विहीत नमुन्यात (with Affidavit Before magistrate / Nottary) प्रतिज्ञापत्रात 1) नाव 2) Tender ID 3) Tender Amount 4) सध्याचा मोबाईल क्रमांक 5) Email ID 6) संस्थेचा अधिकृत पत्ता 7) PAN No 8) स्वत:च्या बँकेचे खातेनंबर ज्यावरुन Internet banking व्दारे रक्कम जमा केली आहे. 9) बँकेचे नाव शाखा व IFS कोड 10) Upload केलेली कागदपत्रे खरी असल्याबाबतचे शपथपत्र 11) बी-1 निविदा फॉर्मवरील अटी व शर्ती मला मान्य आहेत. 12) स्वाक्षरी नमुना ही सर्व माहिती नमुद करावी.

13) तांत्रिक निविदा Online उघडलेनंतर कंत्राटदारांना पात्र / अपात्र बाबत निर्णय घेतल्यानंतर निविदेबाबत आक्षेप नोंदविण्यासाठी कंत्राटदारांना तीन दिवसांचा कालावधी असेल. सदर कालावधीत स्वत: उपस्थित राहुन आक्षेप नोंदवावा अन्यथा आपल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

14) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएसटी/2018/प्र.क्र.127/इमा 2दि. 28 नोव्हेंबर 2018 अन्वये Additional Performance Security Deposit रक्कमेचा D.D. निविदा भरतांना स्कॅन करुन अपलोड करणेची आवश्यकता नाही सदरचा D.D. L-1 निविदाकाराने व्यापारी मुल्यंकन झालेचे नंतर निविदाकरास प्राप्त होणा-या System Auto Generated Message (BOQ) मुल्यांकन तक्ता तयार झाल्यानंतर प्राप्त होणारा) पासुन सार्वजनिक सुटया धरुन आठ दिवसांच्या आंत कार्यालयास सादर करावा.
त्याकरीता कार्यालयाकडून कोणताही स्वतंत्र पत्र व्यवहार हा मक्तेदार संस्थेस करण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी. L1 मक्तेदार संस्थेने जर विहीत कालावधीत **संकल्पीत DD हा कार्यालयात सादर केला नाही तर त्याबद्दल मक्तेदार संस्थेची बयाणा रक्कम ही जप्त करण्याची शास्ती ही प्रस्तावित करण्यात येईल.**

15) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएसटी/2017/प्र.क्र.08/इमा 2 दि. 26 नोव्हेंबर 2018 अन्वये प्रथम न्यूनतम देकाराच्या (L-1) निविदाकाराने Additional Performance Security Deposit आठ दिवसाच्या आत मुदतीत भरणा केला नाही तर द्वितीय न्युनतम देकाराच्या (L-2) निविदाकारास लेखी व प्रतिज्ञापत्रात समाविष्ठ असलेल्या संपर्क करण्याच्या Email ID व भ्रमणध्वनी

वर संपर्क करुन विचारणा करुन L-2 निविदाकार L-1 पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्याची निविदा मंजूर करणेत येईल. जर L2 मक्तेदार संस्थेने काम करण्यास 3 दिवसांच्या आत नकार प्रस्तावित केला तर सदरची निविदा ही पुन:प्रसारीत करण्यात येईल व सदरच्या प्रसारणास व्दितीय प्रसारण संबोधन्यात येईल व ज्या L1 निविदाकाराने कामाचा DD सादर केलेला नव्हता तो सदरच्या कामात स्पर्धा करण्यास अपात्र राहील.

16) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.सीएसटी-2017/प्र.क्र.08/इमा 2 दि. 29/1/2019 अन्वये कंत्राटदाराचा लिफाफा क्रं.2 उघडण्यात आल्यानंतर जर कंत्राटदाराने काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन अशा कंत्राटदारास जिल्हा परिषदेमधील सर्व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास एक वर्षासाठी प्रतिबंध करण्यात येईल.

17) शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सीएसटी/2018/प्र.क्र.127/इमा 2दि. 28 नोव्हेंबर 2018 अन्वये रु.500/- च्या स्टॅम्प पेपर वर अपलोड करण्यांत येणारे सर्व कागदपत्र खरी असुन ती खोटी / बनावट असल्यास त्यास सर्वस्वी कंत्राटदार जबाबदार असलेबाबत स्वत:चे प्रतिज्ञापत्र सादर करावे. (Tender Notice मध्ये विहित नमुना सादर केला आहे.)

18) नोंदणीकृत कंत्राटदारामध्ये सर्व पात्र / सक्षम सुबेअ व त्याच तालुक्यातील म.स.स.हे देखील भाग घेऊ शकतील म.स.स.साठी राखीव असलेल्या कामासाठी म.स.स.वर्ग अ व ब हे निविदा भरु शकतील.

19) कंत्राटदाराने कामाची विमा पॉलीसी काढणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने कार्यारंभ आदेशाच्या दिनांकापासुन 1 महिन्याच्या आत कामाची विमा पॉलीसी काढली नाही तर त्या कामाच्या प्रथम देयकातुन विमा पॉलीसीची 1% रक्कम वसुल करण्यात येईल.

20) जर कंत्राटदाराने परिशिष्ठ "ब" मधील बाबीच्या मटेरीयल चाचणी अहवाल विहीत मानकाप्रमाणे सादर केले नाही तर त्या चाचणीसाठी येणा-या खर्चाच्या 5 पट रक्कम देयकातुन वसुल करण्यात येईल.

21) रॉयल्टी व मटेरियल टेस्टींग यावरील जीएसटी चार्ज भरल्याची पावती सादर केल्यानंतर कंत्राटरारास सदर रक्कम देयकातुन परत करण्यात येईल.

22) परिशिष्ट "ब" मध्ये PART A व PART B असे दोन भाग आहेत. PART A मध्ये कामाच्या सर्व बाबी नमंद केल्या आहेत. सदर निविदा मंजुर झाल्यानंतर देकार अ फक्त भाग अ करता लागु राहिल. भाग ब करीता नागु राहणार नाही. कंत्राटदारास देयक अदा करतांना PART A मधील बाबीवर निविदा स्विकृत दराने देयक अदा करण्यात येईल. PART B मध्ये **GST, ROYALTY, CONTINGENCY, LAB INSURANCE, SQM CHARGES, TESTING CHARGES इत्यादी बाबी कंत्राटदारास PART A मधील झालेल्या कामाच्या देयकावर आवश्यकतेप्रमाणे अदा करण्यात येईल.**

23) निविदा ऑनलाईन करतांना मागील 3 वर्षाचे Income tax Return upload करणे आवश्यक आहे.

24) PAN/GST क्रं.नोंदणी पत्रावर असल्यास ते देखील ग्राहय धरल्या जातील.

25) शासनाकडुन निधी उपलब्धतेच्या अधिन राहुन काम पुर्ण झालेनंतर देयके अदा करण्यात येतील.

26) निविदा सादरीकरण / स्विकृती फक्त ऑनलाईन पध्दतीनेच करणेत येतील. निविदा संबंधी कोणतेही मुळ कागदपत्रे प्रमाणपत्रे जमा करण्यासाठी निविदाकाराने कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. तथापी न्युनतम देकार देणा-या निविदाकाराला Financial Bid Opening नंतर निविदा स्विकृतीपूर्वी सर्व Upload केलेली कागदपत्रे मूळ कागदपत्रांबरोबर **" सहाय्यक लेखाधिकारी, इवद विभाग क्रमांक ३ "** यांचे कडून पडताळणी करुन घेणे बंधनकारक राहील.

27) आर्थिक लिफाफा / निविदा उघडल्यानंतर कंत्राटदार यांना इतर कोणत्याही कंत्राटदारावर त्यांच्या पात्र / अपात्रतेवर आक्षेप नोंदवु शकनार नाही.

**कार्यकारी अभियंता**
**इवद विभाग क्र.3**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**अति.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

STATEMENT NO.1

( Separate for Each Work)

A. Name of Tenderer and Mobile No.

B. Name of the work, Tender ID for Which Bid is Submitted-

C. Tender form fee paid online Amount-

D. EMD paid online Amount-

E. Name of the Bank and Branch from Which EMD and tender fee paid online

F. Bank Account Number from Which EMD and tender fee paid online

G. Bank Account Holder Name from Which EMD and tender fee paid online

It is to certify that EMD and Tender Fee is paid online from the above bank account which is owned by me.

**Contractor Signature**

**सोबत जोडावयाचे कागदपत्र**

१. **निविदा रक्कम व बयाना रक्कम ऑनलाईन भरणा केलेली पावती जोडणे आवश्यक आहे.**

२. Registration Certificate of Zilla Parishad Nashik

३. G S T Registration Certificate / Acknowledgment of GST Registration

४. Professional Tax Registration Certificate (PTR), P.T. Challan

५. Declaration Signed by Contractor Rs ५०० stamp paper (with Affidavit Before magistrate / Nottary)

6. **निविदेस** Similar type Workdone certificate (Last **Five** year) **जोडणे** आवश्यक आहे. **सदर** Workdone certificate **व** Quantity certificat **हे कमीत कमी कार्यकारी अभियंता समकक्ष दर्जाच्या अधिका-यांनी साक्षांकित केलेले असावे.**
   6.1 निविदेत सहभाग घेणा-या निविदा धारकाने निविदा रक्कमेच्या 80% चे 01 काम पुर्ण केलेले असावे.
   6.2 निविदेत सहभाग घेणा-या निविदा धारकाने निविदा रक्कमेच्या 50% चे 02 काम पुर्ण केलेले असावे.
   6.3 निविदेत सहभाग घेणा-या निविदा धारकाने निविदा रक्कमेच्या 40% चे 03 काम पुर्ण केलेले असावे

7. मजुर सहकारी संस्थांसाठी राखीव असलेल्या व खुल्या निविदा (Open Tendar) कामांसाठीच्या निविदा त्या त्या मजुर सहकारी संस्था यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातीलच कामांच्या निविदा भरण्यात याव्यात. कार्यक्षेत्राबाहेरील मजुर सहकारी संस्था यांनी भरलेल्या निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तसेच त्यांनी 15.00 लक्षा वरील खुल्या निविदा भरावयाची असल्यास इवद-1 जि.प.नाशिक येथे 2500/- रु भरुन आपली पतमर्यादा वाढविणे आवश्यक आहे व पतमर्यादा वाढविल्याबाबतचा पुरावा सोबत जोडणे आवश्यक राहील. (उदा.2500/- भरल्याची पावती अथवा नोंदणी प्रमाणपत्र)

8. **सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांनी रु. 5 लाखाचे वरील व रु. 15 लाखापर्यंतचे काम घेण्यासाठी यापुर्वी रु.5 लाखाचे आतील / पर्यंतचे काम जि.प./ शासनामार्फत पुर्ण केले असल्याबद्दलचा Workdone Certificate दाखला जोडणे आवश्यक राहील.**

9. **परिशिष्ठ 1 मधील विहीत नमुन्यातील माहिती**

10. **निविदा सुचनेतील रु.100 लक्ष चे वरील कामांना निविदा पुर्व बैठक आयोजित केलेली असून निविदा पुर्व बैठक (Pre bid Meeting) घेण्यात येईल.**

11. **जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक 02/03/2023 मधील ठरावानुसार तांत्रिक अडचण सोडुन नविन कामांच्या निविदा भरतांना संबंधित ठेकेदार, संस्था यांचेकडील मागील कामे प्रलंबित नसल्याबाबतचा दाखला संबंधित तालुक्यातील उप अभियंता यांचेकडुन घेण्यात येऊन निविदा कागदपत्रासोबत जोडणे बंधणकारक असणार आहे. सदर दाखला असल्याशिवाय निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.प्रत्येक कामाचा दाखला कामनिहाय घेण्यात यावा. ई निविदा प्रक्रियेत अटी व शर्ती शिथिल करण्याचे अधिकार अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील.**

---

1) **Registration Certificate Of Zilla Parishad Nashik**

कंत्राट मागविणेसाठी नाशिक जिल्हा परिषदेची कंत्राटदार नोंदणी आवश्यक आहे.

2) **G S T Registration Certificate / Acknowledgment of GST Registration**

**G S T** रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट असणे आवश्यक आहे. अथवा **G S T** नोंदणीबाबतची पावती ई निविदा दाखल करतांना निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.

**3)ई-निविदा सादर करतांना Professional Tax Registration Certificate (PTR) / P.T. Challan Certificate तसेच चालु व मागील आर्थिक वर्षात भरलेले चलन सादर करणे आवश्यक आहे अन्यथा निविदा नाकारण्यात येईल.**

ई निविदा सादर करतांना **Professional Tax Registration Certificate (PTR)** असणे आवश्यक बाब आहे.

4) **Declaration Signed by contractor Rs.500/- Bond Paper (with Affidavit Before magistrate/ Nottary)**ई निविदा सादर करतांना निविदा कागदपत्रांमध्ये प्रसारीत करण्यांत आलेल्या विहित नमुन्यातील **Declaration Signed by Contractor** हा विहित नमुन्यातील रु.500/- बाँन्ड च्या पेपरवर येणे आवश्यक आहे. सदर निविदा भरताना रु.500/- बॉन्ड च्या पेपरवर प्रतिज्ञापत्र (**Affidavit**) जी निविदा भरावयाची आहे. त्याचेच एका ( 1 ) नांव लिहावे. त्यात बँकेचे नांव, खाते क्रमांक, बँकेचा **IFSC** कोड असणे आवश्यक आहे जेणेकरुन विविध निविदांची बयाणा रक्कम भरणा करतांना ती एकाच खात्यामधुन भरणा न झाल्याबाबत खात्री होईल.

**5) परफॉर्मन्स सिक्युरीटी (Performance Security) डिपॉजीट :- निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा -1% ते 10 % टक्के पर्यंत कमी दराने असल्यास, 10 % ते 15 % पर्यंत जास्त दराने कमी असल्यास व 15 % पेक्षा जास्त कमी दराने असल्यास त्या त्या प्रमाणात लागु (महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.बीडीजी 2016/प्र.क्र.2/इमा.2 मंत्रालय मुंबई- 400032 दि.12/02/2016 व शासन परिपत्रक क्र. सीएटी/2017/प्र.क्र.08/इमा-2 दि.26/11/2018 अन्वये ) :-**

अ) निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा दहा टक्क्यांपेक्षा अधिक दराने कमी असेल तर कंत्राटदारास एवढया कमी दरात काम करण्याचे नियोजनाबाबत सविस्तर तपशील (दर पृथ्थकरण तपशिल) सही शिक्क्यानिशी व्यापारी लिफाफा उघडल्यानंतर L1 निविदा धारकास 5 दिवसांचे आंत संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता यांचेकडेस सादर करणे बंधनकारक राहील.

ब) प्राप्त निम्नतम निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किमतीपेक्षा 1% ते 10 % पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदारांनी निविदाधीन किमतीच्या 1 % एवढया रक्कमेचा धनाकर्ष (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणुन व्यापारी लिफाफा उघडल्यानंतर L1 निविदा धारकाने 5 दिवसांचे आंत सादर करावा. (उदा :- 1 % ते 10 % कमी दर - 1% रक्कम)

क) निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या किंमतीपेक्षा 10 % पेक्षा जास्त ते 15 % पर्यत जास्त कमी दराने असेल तर देकार 10 % पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढया रक्कमेचा व वरील बाब-(ब) प्रमाणे येणा-या रक्कमेसह एकत्रित धनाकर्ष (Demand Draft) 5 दिवसांचे आंत सादर करावा. (उदा :- 15 % कमी दर - 1% ते 10 % पर्यंत करिता-1 टक्का व (15 % -10%) - 5% असे एकुण 6 %)

ड) निविदेचा देकार 15 % पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरीत रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम व वरील बाब (ब) व बाब (क) प्रमाणे येणा-या रक्कमेसह डी.डी.द्वारे 5 दिवसांचे आंत सादर करणे अनिवार्य राहील.

उदा :- 19 % कमी दरासाठी खालीलप्रमाणे पृथ:करण

10 % कमी दरापर्यंत 1 % व

15 % पर्यंत कमी दरापर्यंत = 15 % - 10 % =5 %)

तसेच (19-15) = 4 % करीता = 4 X 2 = 8 %असे एकुण 1 + 5 + 8 = 14 %

इ) धनाकर्ष व दर पृथ्थकरण तपशिल निविदा बोलविणारे कार्यकारी अभियंता यांचे नावाने असावा.

ई) धनाकर्ष राष्ट्रीयकृत बँकांकडुन व निविदा धारकाने स्वत: काढलेला असावा. धनाकर्षावर बँकेचा MICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे.

उ) धनाकर्षाची मुदत तीन महिन्यांपर्यतची असावी.

ऊ) धनाकर्ष व दरपृथ्थकरण तपशिल लिफाफ्यामधुन L-1 कंत्राटदाराने 5 (पाच) दिवसांत (कार्यालयीन दिवस) कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात जमा करावे. लिफाफ्यावर नांव व निविदा सुचना क्रमांक लिहिण्यांत यावा. जमा करतेवेळेस कार्यालयाची दिनांकित पोहोच घ्यावी.

ए) प्रथम न्युनतम देकाराच्या (L-1) निविदाकाराने वरील विहित मुदतीत अतिरीक्त सुरक्षा अनामत रक्कमेचा डी.डी.द्वारे भरणा केला नाही तर त्याची बयाना रक्कम जप्त / वसुल करुन द्वितीय न्यूनतम देकाराच्या (L-2) निविदाकारास विचारणा करुन व L-2 निविदाकार L-1 पेक्षा कमी दराने काम करण्यांस तयार असल्यास त्याची निविदा मंजुर करण्यांत येईल.

**6) सदर काम घेण्यास सुशिक्षीत बेरोजगार अभियंता पात्र असल्यास रु. 5 लाखाचे वरील व रु. 15 लाखापर्यंतचे काम घेण्यासाठी यापुर्वी रु.5 लाखाचे आतील / पर्यंतचे काम जि.प./ शासनामार्फत पुर्ण केले असल्याबद्दलचा Workdone Certificate दाखला जोडणे आवश्यक राहील.**

**7) रु.15 लक्ष चे वरील काम असल्यास निविदा घेण्यास पात्र असलेल्या निविदा धारकांना सदर प्रकारचे कामाचा अनुभव असल्याबाबतचा कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरीचा workdone Certificate दाखला जोडणे आवश्यक आहे.**

8) सदर 15.00 लक्षा वरील खुल्या निविदा भरावयाची असल्यास इवद-1 जि.प.नाशिक येथे रु.2500/- रु भरुन आपली पतमर्यादा वाढविणे आवश्यक आहे व पतमर्यादा वाढविल्याबाबतचा पुरावा सोबत जोडणे आवश्यक राहील. (उदा. रु.2500/- भरल्याची पावती अथवा नोंदणी प्रमाणपत्र )

9) निविदा कोणत्याही पातळीवर अपात्र करणे किंवा रद्य करणे याबाबतचा अधिकार जिल्हा परिषदेस आहे.

10) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन परिपत्रक क्र.सीएसटी-2017/प्र.क्र.08/इमा-2 दि. 29/1/2019 अन्वये कंत्राटदाराचा लिफाफा क्रं.2 उघडण्यात आल्यानंतर जर कंत्राटदाराने काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन अशा कंत्राटदारास जिल्हा परिषदेमधील सर्व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास एक वर्षासाठी प्रतिबंध करण्यात येईल.

11) कंत्राटदाराने वनविभागाच्या पुर्वपरवानगीशिवाय वन खात्याच्या हद्दीत कोणतेही काम करु नये. केल्यास कंत्राटदार त्यास वैयक्तीक रित्या जबाबदार राहील. तसेच कंत्राटदाराने कोणत्याही खाजगी मालकीच्या जागेत काम करु नये.

**कार्यकारी अभियंता**
**इवद विभाग क्र.3**
**जिल्हा परिषद, नाशिक**

**अति.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

Signature Not Verified
Digitally signed by Dilip Narayan Tarde
Date: 2026.04.30 17:48:26 IST
Location: Maharashtra-MH